Literacy for a Billion

Movie: Lagin Mazya Khandobacha
Year: 2009

Song: Sumbran mandil ga biriba
Lyricist: S.Narule, Suresh Chikhle

सुंबरान मांडिला गा बिरोबा या देवाचं
सुंबरान मांडिला गा बिरोबा या देवाचं
धरणी आई मातेचं गा सूर्यदेव पित्याचं
धरणी आई मातेचं गा सूर्यदेव पित्याचं
विरोबादेव सांगतो घ्या की तुम्ही ध्यानी हो
हे विरोबादेव सांगतो घ्या की तुम्ही ध्यानी हो
अन् माणसाहून मेंढरं लई लई श्यानी हो
माणसाहून मेंढरं लई लई श्यानी हो

कुणी लोटी अंगण कुणी टाकी सडा हो
आरश्यावानी निर्मळ धनगराचा वाडा हो
ए कुणी लोटी अंगण कुणी टाकी सडा हो
आरश्यावानी निर्मळ धनगराचा वाडा हो
मेंढराला कुरवाळीत गाई कुणी गाणी हो
ए मेंढराला कुरवाळीत गाई कुणी गाणी हो
आणि माणसाहून मेंढरं लई लई श्यानी हो
माणसाहून मेंढरं लई लई श्यानी हो

रात दिस डोळ्या म्होरं आमची हो लेकरं
पोरावानी थोर आम्हां हायती गा मेंढरं
ए रात दिस डोळ्या म्होरं आमची हो लेकरं
पोरावानी थोर आम्हां हायती गा मेंढरं
विरूदेव पाठीराखा येई रानोरानी हो
ए विरूदेव पाठीराखा येई रानोरानी हो
आणि माणसाहून मेंढरं लई लई श्यानी हो
माणसाहून मेंढरं लई लई श्यानी हो

ए नाचत्याती धनगर हालत्याती रूमाल
ढोलासंग थैताळ करतोया कमाल
ए नाचत्याती धनगर हालत्याती रूमाल
ढोलासंग थैताळ करतोया कमाल
भंडाऱ्यानं माखला विरू सोन्यावानी हो
ए भंडाऱ्यानं माखला विरू सोन्यावानी हो
आणि माणसाहून मेंढरं लई लई श्यानी हो
माणसाहून मेंढरं लई लई श्यानी हो

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*